<u>प्रेसनोट –</u>

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दि. १३/०५/२०१८

**ऑनलाईन कॅब बुक करुन कॅबचालकास पिस्टलसारखे हत्यार दाखवुन त्यांचेकडुन जबरदस्तीने फोर्ड फिगो कार, मोबाईल, रोख रक्कम लुबाडणा-या दोघांना दत्तवाडी पोलीसांकडुन अटक**

दि. ११/०५/२०१८ रोजी पोलीस उपनिरिक्षक डफळ दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे हे स्टाफसह पोलीस ठाणेस हजर असताना पो. ना. सुधीर घोटकुले व पो. शि. रोहन खैरे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "दोन इसम हे त्यांचेकडे असणारी नवीन बजाज कंपनीची रिक्षा एम एच १२ क्यु ई २५३० ही घेवुन पु.ल. देशपांडे गार्डन सिंहगड रोड येथे संशयास्पदरित्या थांबले आहेत त्यांचेकडे असणारी रिक्षा ही चोरीचीच असावी" अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने ती बातमी त्यांनी तपासपथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक अनिल डफळ यांना सांगतलेने त्याची खात्री करुन मिळालेली बातमी पो.उ.नि. अनिल डफळ यांनी वरिष्ठांना सांगुन त्यामध्ये मा. प्रविण मुंढे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२, मा. डॉ. शिवाजीराव पवार सहा.पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग पुणे शहर, मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल पाटील सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक श्री डफळ, पोलीस कर्मचारी पो.हवा. तानाजी निकम, पो.ना. सुधीर घोटकुले, पो.ना. रविंद्र फुलपगारे, पो.ना. महेश गाढवे, पो.शि. रोहन खैरे, पो.शि. सागर सुतकर, पो.शि. शरद राऊत, पो.शि. शिवाजी क्षीरसागर यांनी सदर ठिकाणी जावुन बातमीत मिळालेल्या वर्णनाचे इसमांना रिक्षासह ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपली नावे १) सुनिल लक्ष्मण गवळी वय. ३२ वर्षे रा. धायरी गाव धायरेश्वर मंदीराचे मागे पुणे व २) अंगद महादेव गवळी वय. २७ वर्षे, रा. न्यु शांतीनगर, श्रावणधारा सोसायटी कोथरुड पुणे अशी असल्याचे सांगितले त्यांचेकडे असलेली रिक्षा ही चोरीची असल्याचे त्यांनी कबुल केले त्याबाबत दत्तवाडी पोलीस ठाणेस गु.र.नं. १८६/२०१८ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने त्यांना दाखल गुन्हयात काल दि. ११/०५/२०१८ रोजी १८/३० वा. अटक केली होती त्यानंतर त्यांचेकडे आजरोजी अधिक तपास करता त्यांनी पंधरा दिवसापुर्वी ऑनलाईन कॅब बुक करुन कॅबचालकास पु.ल. देशपांडे गार्डन येथे बोलावुन घेवुन त्यास पुण्यात फिरवुन नंतर वारजे माळवाडी मुठा नदीच्या पात्रात त्याला नेवुन त्यास पिस्टलसारखे हत्यार दाखवुन मारहाण करुन त्याचेकडुन जबरदस्तीने फोर्ड फिगो एसपायर कॅब गाडी क्र. एम एच १२ के एन ७७८७ ही व सॅमसंग जे २ मोबाईल, रोख रक्कम ८०००/- रु. हे जबरदस्तीने लुबाडुन घेवुन कॅबचालकास न-हे येथे सोडुन दिले होते असे सांगीतले व ती कॅब गाडी, मोबाईल, पिस्टलसारखे दिसणारे हत्यार आरोपींनी काढुन दिले आहेत. त्याबाबत वारजे माळवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १४१/२०१८ भा.द.वि. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच त्यांनी दत्तवाडी येथील शामसुदंर सोसायटी येथे व पंचमी चौक येथील पेंटॅगॉन इमारतीमध्येही चोरी करण्याचा प्रयत्न केला असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. त्याबाबतही दत्तवाडी पो. स्टे. येथे गु.र.नं. ६९/२०१८ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ प्रमाणे व गु.र.नं. ५१/२०१८ भा.द.वि. कलम ४५७, ३८०, ५११, ४२७ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत असे नमुद आरोपींकडुन दाखल गुन्हयाव्यतीरिक्त आणखी तीन गुन्हे उघडकीस आले असुन त्यांचेकडुन एकुण ६,५३,०००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच त्यांना मा. न्यायालयाने दि. १४/०५/२०१८ रोजी पर्यंतची पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केली असुन दाखल गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक अनिल डफळ हे करीत आहेत.